इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना या केंद्र पुरस्कृत योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्या बाबत ..

**महाराष्ट्र शासन**

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय,क्रमांक :एबावि २०१० / प्र.क्र. १७८ /का-५

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ३० जुलै, २०११

**वाचा:-** केंद्रिय महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क ९-५/२०१०-IGMSY, दिनांक ८ नोव्हेंबर , २०१०

**प्रस्तावना :-** गरीब वर्गातील महिला गरोदरपणात देखील रोजगारासाठी गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत काम करीत राहतात. त्यामुळे त्यांच्या वजनात योग्य त्या प्रमाणात वाढ होत नाही. प्रसुतीनंतर लगेचच शरीर साथ देत नसताना देखील कामाला लागतात. त्यामुळे त्यांच्या शरीराला परत पूर्वावस्थेत यायला बाधा निर्माण होते. त्यांना नवजात अर्भकाचे पहिल्या ६ महिन्या पर्यंत स्तनपान देखील व्यवस्थितपणे करता येत नाही. त्यामुळे , अशा महिलाच्या उत्पन्नात होणारे नुकसान अंशतः भरून काढण्यासाठी प्रसुती लाभ योजनेची नितांत आवश्यकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना त्यांच्या गरोदर आणि स्तनपान कालावधीमध्ये बुडीत मजुरीपोटी नुकसानभरपाई म्हणून रोख रक्कम देऊन त्यांचे आरोग्य व आहाराचा दर्जा सुधारावा या उद्देशाने " **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना (IGMSY)** " सशर्त प्रसुती लाभ योजना राबविण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रस्तावित योजना देशातील ५२ जिल्हयात प्रायोगिक तत्वावर राबविली जाणार असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील भंडारा व अमरावती या दोन जिल्हयाचा समावेश आहे . सदर योजना महाराष्ट्र राज्यातील भंडारा व अमरावती या दोन जिल्हयात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-** एकात्मिक बाल विकास सेवा यंत्रणेमार्फत गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना त्यांच्या गरोदर आणि स्तनपान कालावधीमध्ये बुडीत मजुरीपोटी नुकसानभरपाई म्हणून रोख रक्कम देऊन त्यांचे आरोग्य व आहाराचा दर्जा सुधारावा या उद्देशाने इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना (IGMSY) हया केंद्र शासन पुरस्कृत नवीन योजनेची राज्यातील भंडारा व अमरावती या दोन जिल्हयांमध्ये अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेचा लाभ अंगणवाडीत नोंदणीकृत गरोदर महिला व स्तनदा मातांना देण्यात यावा. घरी प्रसुती (delivery) झालेल्या महिलांनाही सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

२. भंडारा व अमरावती हया दोन जिल्हयातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची अंगणवाडीत नोंदणी करून त्यांना खालील प्रमाणे तीन टप्प्यात एकूण रू ४,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात यावी. सदर रक्कम त्यांचे बँक / पोस्ट ऑफिस खात्यात जमा करण्यात यावी. ही जबाबदारी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील.

४) पहिल्या टप्प्यात रू १,५००/- इतकी रक्कम, गरोदरपणात नोंदणी करण्याच्या अटीवर, गरोदरपणाचे ६ महिने पूर्ण झाल्यानंतर बाल विकास प्रकल्प अधिकारी हयांनी अंगणवाडी सेविकेमार्फत गरोदर मातांच्या बँक /पोस्ट ऑफीस खात्यात जमा करावी .

५) दुस-या टप्प्यात रू १,५००/- इतकी रक्कम बालकाच्या जन्माच्या ३ महिन्यानंतर, बालकाचे लसीकरण झाल्याच्या अटीवर व नियमितपणे स्तनपान होण्याच्या अटीवर, बाल विकास प्रकल्प अधिकारी हयांनी अंगणवाडी सेविके मार्फत मातेच्या बँक / पोस्ट ऑफीस खात्यात जमा करावी.

६) तिस-या टप्प्यात रू १,०००/- इतकी रक्कम बालकाच्या जन्माच्या ६ महिन्या नंतर नियमित स्तनपान व लसीकरण होण्याच्या अटीवर, बाल विकास प्रकल्प अधिकारी हयांनी अंगणवाडी सेविकेमार्फत मातेच्या बँक / पोस्ट ऑफीस खात्यात जमा करावी.

अंगणवाडीच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व गरोदर स्त्रिया / स्तनदा मातांची लगेच नोंदणी करावी व त्यांना स्वतःचे बँक खाते / पोस्ट ऑफिस खाते त्वरित उघडण्यासाठी प्रवृत्त करावे.

३. **गरोदर व स्तनदा महिलांच्या आरोग्य व पोषण परिस्थिती सुधारणा घडवून आणण्यासाठी मुख्यसेविका, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गरोदर व स्तनदा मातांना खालील प्रमाणे समुपदेशन करावे.**

४) गर्भारपण , सुरक्षित प्रसुती व स्तनपान या दरम्यान योग्य सवयी, काळजी व सेवा यांसाठी प्रोत्साहित करणे.

५) महिलांना योग्य त्या शिशु व बाल आहार प्रदान मार्गाचा अवलंब करावा, जसे लवकरात लवकर व पहिल्या सहा महिन्यात निव्वळ स्तनपान यासाठी प्रोत्साहित करणे .

६) गरोदर व स्तनदा महिलांना रोख रकमेने प्रोत्साहित करून चांगल्या आरोग्य व आहारासाठी पूरक वातावरण तयार करण्यास मदत करणे.

४. **या योजनेअतंर्गत खालील लाभार्थ्यांना लाभ घेता येईल.**

१) १९ वर्ष व त्यापुढील वयाच्या गरोदर महिला, त्यांच्या पहिल्या दोन सजीव प्रसूतीपर्यंत

(निर्जीव प्रसूतीसाठी योजनेमधील मार्गदर्शक नियम लागू पडतील. )

२) सर्व शासकीय व सार्वजनिक उपक्रमातील (केंद्र व राज्य) कर्मचारी यांना सहवेतन मातृत्व रजा मिळत असल्यामुळे त्यांना हया योजनेतून वगळण्यात आले आहे,

३) शासन निर्णयाच्या दिवशी किमान ६ महिने पूर्ण झालेल्या गरोदर मातेला अजून प्रसुती झालेली नसल्यास पहिला हप्ता लगेच वाटप करावा. शासन निर्णयाच्या दिवशी किंवा त्यापूर्वी ज्या महिलांचे बाळंतपण (delivery ) झालेली आहे, त्यांना पहिला हप्ता देण्यात येवू नये. त्यांना भविष्यात फक्त दुसरा व तिसरा हप्ता देण्यात यावा. शासन निर्णयाच्या दिवशी ज्या स्तनदा मातांचे मूल ३ महिन्यापेक्षा लहान आहे , त्यांना दुसरा हप्ता लगेच वाटप करावा व ज्या स्तनदा मातांचे मूल ३ ते ६ महिन्यांचे आहे, त्यांना लगेच ३ रा हप्ता वाटप करावा त्यापूर्वीचे दोन हप्ते त्यांना वाटप करू नयेत.

५. बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्य सेविका आणि अंगणवाडी सेविका यांनी या योजनेची त्यांच्या कार्यक्षेत्रात व्यापक प्रसिध्दी दयावी. वर्तमानपत्रात प्रेस नोट द्यावी. ''ग्राम आरोग्य व पोषण दिवस'' या दिवशी योजना गावात जाहिर करावी. सर्व लाभधारकांची नोंदणी करून घ्यावी. तसेच अशा लाभ धारकांचे राष्ट्रीय बँकेत अथवा पोस्ट ऑफीसमध्ये तात्काळ खाते उघडावे .

६. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेली रक्कम तातडीने मिळण्याच्या दृष्टीने नोंदणीकृत लाभार्थ्यांची यादी व संख्या बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी नियमितपणे अद्ययावत करावी व सदर पात्र लाभार्थ्यांना पहिला, दुसरा व तिस-या हप्त्याची अनुज्ञेय रक्कम पंधरा दिवसाच्या आत अदा करण्याची दक्षता घ्यावी. खालील अटींची पूर्तता करीत असलेल्या महिलेला अनुज्ञेय रक्कम त्वरित अदा करण्याची कार्यवाही खालील प्रमाणे करावी .

| रक्कम हस्तांतरण | अटी | रक्कम | खातरजमा करण्याचे मार्ग |
|---|---|---|---|
| पहिले (दुस-या तिमाहीच्या अखेरीस) | अंगणवाडी किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात गरोदरपणाच्या पहिल्या ४ महिन्यात नांव नोंदणी करणे आवश्यक राहील. लोह, फोलिक ॲसिड गोळया व टीटीच्या इंजेक्शनसहित किमान एक प्रसूतीपूर्व चाचणी आणि अंगणवाडीमध्ये किमान एक समुपदेशनास हजेरी आवश्यक. | रू १५००/- | माता व बालक सुरक्षा कार्ड ज्यावर नोंदणी अंगणवाडीत वा चिकित्सा केंद्राला केल्याचा अंगणवाडी सेविकेने सही केलेला दाखला. |
| जननी सुरक्षा अंतर्गत (JSY) प्रोत्साहन | रूग्णालयात प्रसूत होण्यासंबंधीचे पॅकेज ज्यामध्ये लवकरात लवकर स्तनपान सूरू करण्याची हमी आहे. | जननी सुरक्षा योजनेच्या (JSY ) निकषानुसार (सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत) | --- |
| दुसरे (प्रसूतीनंतर ३ महिन्यांनी) | प्रसुती नोंदणी केली आहे,बालकाला खालील लसीकरण झाले आहे, जन्म घेतेवेळी OPV व BGG , ६ आठवडयानंतर OPV व DPT, १० आठवडयानंतर OPV व DPT,प्रसूतीनंतर ३ महिन्याच्या आत बालक वाढीवर देखरेख करणारे व शिशु व बाल पोषणाच्या पध्दती (Infant & Young Child Feeding) च्या किमान २ समुपदेशन सत्रास | रू १५००/- | माता - बालक सुरक्षा कार्ड बालकवाढ तक्ता व लसीकरण रजिस्टर (निर्जीव प्रसूती व बालमृत्यू साठीही उपलब्ध.) |

| | | | |
|---|---|---|---|
| | उपस्थितअसल्याचा दाखला असणे आवश्यक. | | |
| तिसरे (प्रसूतीनंतर ६ महिन्यांनी ) | ६ महिन्यात निवळ स्तनपान तसेच मातेव्दारा प्रमाणीत पूरक आहाराची सुरूवात केल्याचा दाखला .बालकाला OPVव DPT चा तिसरा डोस दिला जाणे.तिस-या व सहाव्या महिन्यांच्या कालावधीत बालक वाढीवर देखरेख करणारे व IYCF च्या किमान २ समुपदेशन सत्रास उपस्थित असल्याचा दाखला असणे आवश्यक . | रू १०००/- | स्वयं दाखला (Self Certification), माता-बालक सुरक्षा कार्ड, बालकवाढ तक्ता व लसीकरण रजिस्टर |

७. अंगणवाडी सेविकेस प्रति लाभार्थी रू २००/- आणि मदतनीस यांना प्रति लाभार्थी रू १००/- इतका प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात येत आहे. सदर भत्ता मिळविण्यासाठी अंगणवाडीच्या कार्यक्षेत्रातील सर्व गरोदर महिला व स्तनदा मातांची नोंदणी करण्याची जबाबदारी त्यांची राहील. विशेषत : शेतमजूर, ऊस तोड कामगार महिला , बांधकाम मजूर , विट-भट्टी कामगार महिला , स्थलांतरीत कामगार (Migratory Workers) महिला, दलित वस्तीत राहणा-या महिला अशा सर्व दुर्लक्षित महिलांना या योजनेचा लाभ देण्याची दक्षता त्यांनी घ्यावी . या शासन निर्णयाच्या दिनांकापासून नोंदणी करणा-या पात्र महिलेस या योजनेअंतर्गत आर्थिक लाभ अनुज्ञेय राहतील.

८. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेची राज्यातील भंडारा आणि अमरावती या दोन जिल्हयात अंमलबजावणी करण्यासाठी सन २०११-१२ या चालु वित्तीय वर्षासाठी राज्यस्तरावरील प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी रू १३,००,०००/- विवरण पत्र (अ) प्रमाणे, जिल्हास्तरावरील खर्च भागविण्यासाठी विवरण पत्र (ब) प्रमाणे रू १५,७२,०००/-, लाभार्थ्यांच्या अनुदानासाठी रू ८,१६,०७,२००/- आणि अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रति लाभार्थी प्रोत्साहन भत्त्यासाठी रू ८६,०४,०००/- अशा एकूण रू ९,३०,८३,२००/- (नऊ कोटी तीस लाख त्र्याऐंशी हजार दोनशे फक्त) (रू ९.३० कोटी) एवढया खर्चास आणि विवरण पत्र (अ) मधील दोन पदे आणि विवरण पत्र (ब) मधील प्रत्येक जिल्हयांसाठी दोन याप्रमाणे ४ पदे अशी एकूण ६ पदे करार पध्दतीने भरण्यास , प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. राज्यस्तरावरील कार्यालय पुणे येथे स्थापन करणे बाबत आणि करार पध्दतीने कर्मचारी नियुक्त करणे बाबत आयुक्त, महिला व बाल विकास यांनी तात्काळ कार्यवाही करावी. आयुक्त, महिला व बाल विकास , महाराष्ट्र राज्य पुणे आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना "नियंत्रक तथा आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

९. या योजनेअंतर्गत होणारा खर्च कोणत्या उप लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविण्यात यावा,याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(श.पा.वारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव , वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, (व्यय) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव ,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव ,सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग.
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधान भवन, मुंबई
जिल्हाधिकारी भंडारा / अमरावती
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा / अमरावती
महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी भंडारा / अमरावती
उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( बाल कल्याण), जिल्हा परिषद भंडारा / अमरावती
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे
सहाय्यक संचालक, (वित्त व लेखा) , महिला व बाल विकास , पुणे
नियोजन विभाग (का-१४७२) , मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय) मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभागातील सर्व उप सचिव / अवर सचिव व कार्यासने मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कार्यासन -५)

## विवरण पत्र - अ (राज्यस्तर खर्च)

| अ.क्र. | बाब | खर्च (रूपये) |
|---|---|---|
| अ | अनावर्ती खर्च | |
| १ | कार्यालयाचे फर्नीचर (खुर्च्या, कपाट टेबल) | १,००,०००/- |
| २ | वेब कॅमेरा आणि यू.पी.एस. सह प्रति रू ३५,०००/- आणि दोन प्रिंटर कम स्कॅनर प्रति रू १०,००/- | ८०,०००/- |
| | एकूण अ | १,८०,०००/- |
| ब आवर्ती व्यय खर्च | | |
| ३ | कर्मचा-यांचे वेतन | |
| | १ राज्य समन्वयक रू ३०,०००/- | ३,६०,०००/- |
| | १ कार्यक्रम सहाय्यक रू १५,०००/- | १,८०,०००/- |
| | **एकूण** | **५,४०,०००/-** |
| ४ | जागेचे भाडे (**राज्य केंद्रीय एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या आवारात उपलब्ध नसेल तर**) रू ५, ०००/- प्रति दरमहा x १२ महिने (प्रत्यक्षात ) | ६०,०००/- |
| ५ | इंदिरागांधी मातृत्व सहयोग योजनेतील कर्मचां-यांकरिता राज्य शासनाच्या नियमानुसार देय वाहतूक भत्ता (प्रत्यक्षात ) | २,००,०००/- |
| ६ | प्रशासनीक खर्च (पाणी , वीज,टपाल,स्टेशनरी , दूरध्वनी, इ. ) रू १०,०००/- दरमहा | १,२०,०००/- |
| ७ | विविध आकस्मिक खर्च | २,००,०००/- |
| | **एकूण ब** | **११,२०,०००/-** |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **१३,००,०००/-** |

## विवरण पत्र - ब (जिल्हा स्तरावरील खर्च )

| अ.क्र | बाब | रूपये |
|---|---|---|
| अ ) अनावर्ती खर्च | | |
| १ | फर्नीचर आणि इतर कार्यालयीन वस्तु (टेबल, खर्च्या, कपाटे, झेरॉक्स मशिन इ.) | ५०,०००/- |
| २ | वेब कॅमेरा आणि यू.पी.एस. सह प्रति रू ३५,०००/- आणि [illegible] प्रिंटर कम स्कॅनर प्रति रू १०,००/- | ८०,०००/- |
| | **एकूण अ** | **१,३०,०००/-** |
| ब) आवर्ती खर्च | | |
| ३ | कर्मचा-यांचे वेतन | |
| | १ जिल्हा समन्वयक रू २०,०००/- | २,४०,०००/- |
| | १ कार्यक्रम सहाय्यक रू १०,०००/- दरमहा | १,२०,०००/- |
| | **एकूण वेतन रू** | **३,६०,०००/-** |
| ४ | जागेचे भाडे (जिल्हा केंद्रीय एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या आवारात उपलब्ध नसेल तर) रू ३, ०००/- प्रति दरमहा x १२ महिने (प्रत्यक्षात ) | ३६,०००/- |
| ५ | इंदिरागांधी मातृत्व सहयोग योजनेतील कर्मचां-यांकरिता राज्य शासनाच्या नियमानुसार देय वाहतूक भत्ता (प्रत्यक्षात ) | १,००,०००/- |
| ६ | प्रशासनीक खर्च (पाणी, वीज,टपाल,स्टेशनरी , दूरध्वनी, इ. ) रू ५,०००/- दरमहा | ६०,०००/- |
| ७ | विविध आकस्मिक खर्च | १,००,०००/- |
| | **एकूण ब** | **६,५६,०००/-** |
| | **एकूण खर्च (अ + ब )** | **७,८६,०००/-** |
| | **दोन जिल्हयांसाठी एकूण खर्च रू** | **१५,७२,०००/-** |

-------